"आंतर–विदयाशाखीय अभ्यासक्रमा अंतर्गत समाजकार्य विषयातील विदयावाचस्पती (Ph.D.) पदवीच्या नोंदणीसाठी रुपरेषा"

संशोधकाचे नांव	गणेश वामन पाटील.
विषयाचे नांव	समाजकार्य (आंतर–विदयाशाखीय अभ्यासक्रम)
शोधप्रबंध शीर्षक	युवकांच्या व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका (विशेष संदर्भ – नांदेड जिल्हा)
मोबाईल नंबर	8275590944 9892481701
ईमेल	ganesh_patil_1982@yahoo.in
संवर्ग	भ ज. क
मार्गदर्शक	डॉ शेख आसिफोद्दीन ऐनोदिन, (सहाय्यक प्राध्यापक) जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविदयालय सिडको नांदेड.
मोबाईल नंबर	7798783786
ईमेल	aaffan786@gmail.com
संशोधन केंद्र	सामाजिकशास्त्रे संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड.

“ युवकांच्या व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भुमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा.”

प्रकरण 01 प्रस्तावना :-

महाविदयालयीन जीवनात होणारे संस्कार, युवकाला नवीन उर्जा देणारे संस्कार असतात नवपरिवर्तनाची दिशा देण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे विदयापीठातील व महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजना होय.

A) युवकांची माहिती :-

धैर्याने, निष्ठेने, आणि जिददीने एखादया क्षेत्रात युवक स्वत:ला झोकुन देतात. आणि त्यांच्या या वृत्तीतून समाजाला प्रेरणा मिळेल असे काम उभे राहते. असा समुदाय म्हणजे युवक होय. युवकामुळे सक्षम सशक्त शक्तिशाली भारत घडू शकतो. युवक विश्वशांतीसाठी महत्वाची भूमिका निभावू शकतात. ‘वसुधैव कुटुंबकम्’ विश्वच माझा परिवार,या समर्पित भावनेने काम करतात.

आपल्या भारतात स्वामी विवेकानंद यांनी आपल्या सुखी जीवनांचा त्याग केला आणि आपलं जीवन गरीबांच्या सेवेसाठी समर्पित केले त्यांनी राष्ट्रीय चेतना जागृत करून लोकांना एकसंघ ठेवायंच काम केले. महात्मा गांधी आणि गौतम बुद्धांनी भारत भूमीत युवकांच्या माध्यमातून विश्वभर शांती आणि सदभावनेचा संदेश दिला आहे.

युवक हा देशाचा कणा आहे. देशात युवकांमुळे देश हा चळवळीचा बनतो. चळवळीमुळे देश पुढे जातो. जगात स्वातंत्र्य मिळविण्यात त्या त्या देशातील युवकांचा मोठा वाटा आहे. महात्मा गांधीच्या चळवळीत युवकांचा मोठा वाटा होता. तर क्रांतीकारक नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेच्या चळवळीत सुध्दा युवकांचा समावेश होता.

देशात 15-29 वयोगटातील 40% लोकसंख्या आहे. तसेच जगात 65% लोकसंख्या 35 वर्षाच्या आतील आहे.

भारतातील लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेता, जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था 2025 पर्यत बनणारा देश ठरेल. ते युवकांमुळेच.

संयुक्त राष्ट्रांच्या व्याख्येनुसार युवा YOUTH म्हणजे, 15-24 वयोगटातील व्यक्ती होय. हा वयोगट व प्रौढ गटामधील संक्रमण काळ असतो. या वयोगटातील व्यक्तीची संख्या जागतिक लोकसंख्येच्या सुमारे 18% इतकी आहे. जागतिक युवा लोकसंख्येपैकी 84% लोकसंख्या विकसनशील देशात राहते. सुमारे ¼ युवा वर्ग गरीबीच्या परिस्थितीत जगत आहे.

भारतीय लोकसंख्येपैकी सुमारे 70% लोकसंख्या 35 वर्षापेक्षा कमी वयाची आहे. त्यामध्ये 10-19 वर्ष वयांची व्यक्तींची लोकसंख्या सुमारे 225 दशलक्ष आहे. तरूण व्यक्तीची हीच लोकसंख्या भारतासाठी एक लोकसंख्या शास्त्रीय लाभांश (Demographic Dividend) आहे. अर्थात त्यांचा योग्य वापर न केल्यास हीच लोकसंख्या भारतासमोर एक प्रचंड मोठे आव्हान ठरू शकते.

भारतातील युवा लोकसंख्या (15 ते 24 वयोगट) 1961 मध्ये 73.22 दशलक्ष होती. ती वाढून 2001 मध्ये 195.07 दशलक्ष इतकी झाली. एकुण लोकसंख्येमधील युवा लोकसंख्येचे प्रमाण 1961 मधील 16.7 टक्याहून 2001 मध्ये 20% पर्यत वाढली.

बहुतेक अर्थतज्ञ भारताकडे आर्थिक महासत्ता बनण्याची क्षमता देशात असलेल्या तरूणांच्या संख्येमुळे शक्य आहे. असे प्रतिपादन करतात. हे तरूणाईचे वाढते लोकसंख्येतील प्रमाण पुढील 30 वर्ष टिकून राहणार आहे. 2011 च्या शिरगणतीनुसार भारतातील 41% लोकसंख्या 20 वर्षापेक्षा कमी आणि जवळजवळ निम्मी लोकसंख्या 20 ते 59 वयोगटातील तर 9% साठ वयापेक्षा अधिक होते युनोच्या जागतिक लोकसंख्या रिपोर्टनुसार (नोव्हेबर 2014) भारतातील 10 ते 24 वयोगटातील तरूणांची संख्या 35.6 कोटी, जगात अधिक आहे. सध्याच्या अंदाजानुसार 2021 पर्यत भारतातील तरूणांची संख्या 46.4 कोटी होईल 2020 सालापर्यत भारतातील लोकांचे वय फक्त 29 वर्षे असेल.

युवकाच्या अनेक समस्या आहेत त्यात बेरोजगारी महत्वाची समस्या आहे. बेरोजगारीच्या समस्येमागे युवकांची मोठी लोकसंख्या, शिक्षणाची कमतरता शिक्षणांमध्ये व्यावसायीक शिक्षणांचा अभाव त्यामुळे निर्माण झालेली न्युन रोजगारक्षमता, आर्थिक बाढीबरोबर रोजगारांच्या संधीची कमी वाढ ,दारिद्र्य इत्यादी प्रमुख कारणे आहेत. युवकांमध्ये आशा आकांक्षा पुर्ण होऊ न शकल्याने असंतोष मोठया प्रमाणावर असतो.

आशा आकांक्षा पुर्ण करण्यात सतत अपयश आल्याने निर्माण होणारी अस्थिर मनाची किंवा मानसिक विक्षोभाची स्थिती असते. आर्थिक विकासाबरोबर जीवनाप्रती अपेक्षाही वाढतात. मात्र स्पर्धेमुळे आशा आंकाक्षा पुर्ण होऊ न शकल्यास युवकांच्या मनातील असंतोष वाढतो. तसेच युवकांच्या असंतोषाची अनेक कारणे आहेत. अपेक्षीत रोजगार प्राप्त न होणे, साधनहिनता तीव्र स्पर्धा, गरीबी, आर्थिक सांपत्तीक विषमता, शहरीकरण, वाढता व्यक्तिवाद, घटता सामाजिक व कौटुंबिक सुसंवाद जाती व्यवस्थेतून निर्माण होणांरा असंतोष इ. युवा असंतोषाचे परिणाम व्यसनाधिनता, हिसंक वृत्तीची वाढ, गुन्हेगारी, घटती सहिष्णुता कौटुंबिक विसंवाद व हिंसाचार यांसारख्या समस्यामध्ये होतो.

व्यसनाधीनता अंमली पदार्थ व मदयपान हा एक गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. ज्यांचा देशांच्या सामाजिक आर्थिक आरोग्यावर प्रतिकूल प्रभाव पडत आहे. आधुनिक जीवनांतील ताणतणांव व दबावामुळे व्यक्ती विशेषत: तरूणवर्ग अंमली पदार्थाच्या वापरारास अधिक बळी पडत आहेत. अंमली पदार्थाच्या व्यसनामुळे केवळ ती व्यक्तीच नव्हे तर कुटूंब व समाजही प्रभावीत होत असते.

समाधानकारक रोजगार मिळणे, संस्कारशील वर्तन, लोकशाही आचार विचार देशप्रेम समाजासाठीचे उत्तरदायीत्व हा युवा असंतोष दूर करण्यामागील प्रमुख मार्ग आहे.

यांच युवकांचा विधायक कामासाठी उपयोग करून त्यांच्या उर्जेतून देशातील सामाजिक समस्या कमी करण्यास हातभार लावता येऊ शकतो म्हणून या वर्गावर अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. कारण देश सक्षम मजबूत करण्यासाठी त्यांचे योगदान महत्वाचे आहे.

B) व्यक्तिमत्व :-

व्यक्तिमत्व हा शब्द पर्सनॅलिटी या इग्रंजी शब्दाचा प्रतिशब्द आहे. Personality हा शब्द लॅटीन भाषेतील पॅसोना या शब्दापासून तयार झालेला आहे त्यांचा अर्थ मुखवटा असा आहे.

<u>व्याख्या</u> :-

<u>गॉर्डन ऑलपोर्ट</u> :- व्यक्तीचे परिस्थितीशी वैशिष्ट्यपुर्ण समायोजन निर्धारीत करणा-या तिच्या मनो शारीरीक यंत्रणेच्या गतिशील संघटनाला व्यक्तिमत्व असे म्हणतात.

व्यक्तीचे वैशिष्ट्यपुर्ण वर्तन व तिचे विचार निर्धारीत करणा-या तिच्या मनोशारिरीक यंत्रणेच्या गतिशील संघटनाला व्यक्तिमत्व असे म्हणतात.

व्यक्तिमत्व नेहमी गतिशील राहणारे व नेहमी बदलत राहणारे व नवनवीन अनुभव व तिची उदिदष्टे यांच्या परिणामातून होत असतात.

व्यक्तिमत्वात शारिरीक व मानसिक गुणधर्म हे दोन्ही घटक तितकेच महत्वाचे असतात. या दोघांच्या संघटनातून व परस्परांवरील प्रभावातून व्यक्तिमत्व विकसीत होत असते. या व्यक्तिमत्व व व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील गूण वैशिष्टयांच्या आधारे तिचे व्यक्तिमत्व हे इतराहूंन वेगळे व वैशिष्टयपुर्ण म्हणजे एकमेव ठरत असते.

"ऑलपोर्टच्या" मते - व्यक्तिमत्वाचा परिस्थितीशी समायोजन साधण्यावर प्रभाव पडतच असतो. शिवाय आपल्या गरजा व ध्येये साध्य करतांना परिस्थितीशी समायोजन साधण्याच्या प्रक्रियेतून देखील व्यक्तिमत्व घडत जाते.

<u>व्यक्तिमत्वावर परिणाम करणारे घटक</u> :-

<u>अ) शारीरिक घटक</u> :-

1 अनुवंश
2 जैवरसायने किंवा शरीर रसायने
3 शरीरयष्टी किंवा शरीराची ठेवण
4 शारीरिक दुबळेपणा
5 अंतस्त्रावी ग्रंथी

<u>ब) मनोसामाजीक घटक</u> :-

1 कुटूंब
2 सामाजिक वातावरण
3 शालेय वातावरण
4 शेजारी
5 समवयस्कांचा प्रभाव

6 संस्कृती

व्यक्तिमत्वावर प्रभाव पाडणा-या घटकांमध्ये कुटूंब हा खूपच महत्वाचा घटक मानला जातो. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वावर प्रभाव पाडणारे कुटूंबाशी निगडीत तीन मुख्य घटक यात कुटुंबाची संरचना, कौटूंबिक वातावरण, कौटुंबिक नातेसंबध यांचा समावेश होतो.

मुलांच्या व्यक्तिमत्वास आकार देण्यात शालेय वातावरणाची देखील महत्वाची भूमिका दिसते. मुलांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पाडणारे शालेय वातावरणाशी संबधित महत्वाचे घटक यात शिक्षक विद्यार्थी संबंध, धार्मिक संलग्नता, सामाजिक- आर्थिक दर्जा यांचा समावेश होतो. पालकांनंतर शिक्षकच मुलांचा आदर्श असतो. शिक्षक व विद्यार्थी एकमेकांना कसे समजून घेतात, यावर हे संबंध अवलंबून असतात..

व्यक्तीच्या धार्मिक कल्पना, श्रध्दा व मूल्ये यांचाही व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासावर प्रभाव पडत असतो. धर्माचा मूल्ये, नैतिक विकास, बरोबर काय व चूक काय, यावर प्रभाव पडतो. सहकार्य, आक्रमकता, खरे बोलणे, अंधश्रध्दा व धार्मिक मुलतत्वे यांवरही धार्मिक कल्पनांचा परिणाम होतो.

व्यक्तिमत्व विकास व कुटुंबाचा सामाजिक व आर्थिक दर्जा यांचा जवळचा संबंध असतो. उच्च गटातील कुटुंबातील मुले ही सशक्त, विकसीत भावनिकदृष्ट्या प्रगल्भ व बुध्दीमान आढळतात. यामागील कारणे म्हणजे अशा कुटुंबातील मुलांना पुरेसे उत्तेजन व विकासाच्या दृष्टीने लाभदायक कौटुंबिक वातावरण मिळते.

व्यक्तीच्या प्रभावामध्ये शेजारी महत्वाची भूमिका बजवितात. शेजारच्या व्यक्तीची मूल्ये व सामाजिक मापदंड, भूमिका व इतर वर्तनाची रुपे यांवर प्रभाव पडतो. उदा. जी मुले झोपडपट्टीत राहतात किंवा तुटक वर्तन करणाऱ्याच्या शेजारी राहतात, त्यांना अशा प्रकारचा विशीष्ट अनुभव येत नाही व व्यक्तिमत्व विकासाचे हे साधन त्यांना उपलब्ध नसते.

समवयस्क व मित्र यांचा सर्वाधिक परिणाम व्यक्तिमत्वाच्या विकासावर होत असतो. संशोधन अभ्यासातून असे लक्षात येते की, भावंडे व पालक यांच्या तुलनेत समवयस्क गटाचा मुलांवर अधिक प्रभाव पडतो. विकसीत होणाऱ्या मुलांमध्ये व्यक्तिमत्वास आकार देण्यास समवयस्क गट हे संदर्भ समूहाची भूमिका निभावतात. समवयस्क गटाकडूनच मुले काही सामाजिकदृष्ट्या योग्य, तर काही समाजविरोधी वर्तनप्रकार करतात. लिंग भिन्नतेनुसारचे योग्य वर्तन शिकण्यास समवयस्क गटाची मदत होते. मुलांचे सामाजिकीकरण, सुदृढ सामाजिक संबंध, आपुलकीची भावना, स्व ओळख, संवादकौशल्ये, सहकार्य, भूमिका, स्वत:च्या पात्रतांची योग्य जाणीव, भावनिक सुरक्षितता यांसारख्या गोष्टींच्या विकासावरदेखील समवयस्क गटाचा प्रभाव आढळतो. त्याचप्रमाणे काही नकारात्मक वर्तन प्रकार किंवा वृत्तीदेखील समवयस्कांच्या प्रभावातून बळावतात. उदा. व्यसनाधीनता, पूर्वग्रह इत्यादी.

अनेक वर्षांपासून चालत आलेली समाजाची जीवन जगण्याची पध्दती म्हणजे संस्कृती होय. रुढी, परंपरा, मूल्ये, आदर्श राहणीमान, खाणेपीणे, शिष्टाचाराच्या पध्दती यांसारख्या अनेक घटकांचा संस्कृतीमध्ये समावेश होतो. जगभरातील अनेक देशांमध्ये भिन्न- भिन्न संस्कृती पहावयास मिळतात. संस्कृतीचा व्यक्तीच्या वर्तनावर परिणाम होतो. ज्या संस्कृतीमध्ये व्यक्ती वाढते, त्या संस्कृतीचा ठसा व्यक्तिमत्वात आढळतो. भारतीयांच्या तुलनेत अमेरीकन लोक हे उच्च उपलब्धीसाठी प्रेरीत असलेले आढळतात. तांत्रीक व वैज्ञानीक प्रगतीचाही व्यक्तिमत्वावर प्रभाव बघावयास मिळतो. वैज्ञानीक विचारामुळे लोक अधिक व्यवहारवादी झालेले दिसतात. तसेच त्यामुळे अंधश्रध्दा व अतार्किक विचारांचा पगडादेखील कमी झालेला आढळतो. प्रसारमाध्यमांचाही व्यक्तिमत्व विकासावर प्रभाव बघावयास मिळतो. टी.व्ही., रेडीओ, चित्रपट, आजच्या काळातील इंटरनेट व सोशल वेबसाईट्स तसेच वृत्तपत्रे व इतर मुद्रित प्रसारमाध्यमे या सर्वांचा व्यक्तीची जीवनमुल्ये, श्रध्दा, दृष्टीकोन, विचार करण्याच्या पध्दती व विशिष्ट वर्तनप्रकार यांना आकार देण्यात खूपच महत्वाचा वाटा असतो. प्रसारमाध्यमांच्या प्रभावातूनच व्यक्तीच्या सामाजिक जाणिवा, सामान्य ज्ञान, बौध्दीक क्रिया विकसित होताना दिसतात.

विकास:-

“विकास” म्हणजे समाजात आणि सकारात्मक बदल होणे. अशी व्याख्या 2010 च्या “सामाजिक विकास अहवालात" करण्यात आली आहे भौतिकरित्या उत्पादक, समाजात न्याय पर्यावरणांशी सुसंगत अभिरूची पूर्णत्वास नेणारी आणि लोकांना विकासांचा मार्ग निवडण्याची व मार्गस्थ होण्याची संधी देणारी समाज बदलांची प्रकिया म्हणजे विकास होय. जोपर्यत दारिद्रय असमानता व बेरोजगारी कमी होत नाही तोपर्यत त्याला विकास म्हणता येणार नाही. विकासाच्या प्रवाहातून समाजातील काही घटक जसे स्त्रिया, मुले, अपंग, वृदध,मागास अल्पसंख्याक सतत व्यावर्तित Excluded राहतात. युनोने उच्च राहणीमान, संपूर्ण

रोजगार तसेच आर्थिक व सामाजिक उन्नती तसेच विकासास प्रोत्साहन दिले पाहिजे. असे 1948 च्या सनदेमध्ये विकासाबाबत नमूद केले आहे.

D) राष्ट्रीय सेवा योजने बाबत माहिती :-

राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्राच्या युवाशक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी केंद्रीय युवा मंत्रालयामार्फत राबवली जाणारी योजना आहे. भारत सरकार व्दारे चालवला जाणारा एक सक्रीय कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात सहभागी होणारे युवक समाजातील लोकांत मिसळून एकत्रीतपणे समाज विकासा साठीचे काम करतात. जसे ग्रामविकास, साक्षरता कार्यक्रम, पर्यावरण सुरक्षा, आरोग्य सफाई कामकाज, आपत्कालीन समयी पीडीत लोकांना मदत इ. समाजउपयोगी कामे यामुळे समाजसेवा या राष्ट्रीय सेवाच्या गुंणाचा विकास होतो ही कल्पना राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या काळातील आहे. सामाजिक जबाबदारी विद्यार्थ्यांचे पहिले कर्तव्य असावे, तर राष्ट्रीय वस्तू व सेवांसह राष्ट्राची सेवा देणाऱ्या त्यांच्या सेवेसाठी अंतिम समर्पणासाठी स्वत:ला तयार करावे. समाजाशी जिवंत संपर्क साधण्याचा सल्लाही दिला, त्यांनी सुचवले की, आर्थिक आणि सामाजिक अपंगत्वाच्या बाबतीत शैक्षणिक संशोधन करण्याऐवजी युवकांनी "सकारात्मक काहीतरी करावे "

डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील विदयापीठ अनुदान आयोगाने विदयार्थ्यांना आणि शिक्षकांमधील निरोगी संपर्क विकासासाठी आणि कॅम्पस आणि समुदायादरम्यान एक रचनात्मक जोडणी विकसित करण्याच्या दृष्टिने स्वैच्छिक आधारावर शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रीय सेवांची नेमणूक करण्याची शिफारस केली.

3. या विषयावर केन्द्रीय सल्लागार मंडळ (सीएबीई) जानेवारी 1950 रोजी झालेल्या बैठकीत विचार केला गेला. 1952 मध्ये भारत सरकारने सुरू केलेल्या मसुद्याच्या प्रथम पाच वर्षाच्या योजनामध्ये एक वर्षासाठी सामाजिक व श्रम सेविकाची गरज पुढे आली. 1958 मध्ये तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी. पदवीसाठी पूर्वापेक्षित म्हणून सामाजिक सेवा असणे त्यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रीय सेवा सुरू करण्यासाठी एक उपयुक्त योजना तयार करण्यासाठी शिक्षण मंत्रालयाला पुढे सांगितले.

4. 1959 मध्ये, या योजनेचा एक मसुदा शिक्षण मंत्र्यांच्या परिषदेसमोर ठेवण्यात आला. या परिषदेस एक राष्ट्रीय सेवा आवश्यकतेबद्दल एकमत झाले. डॉ. सी.डी.च्या अध्यक्षतेखाली एक राष्ट्रीय सेवा समितीची नेमणूक करण्यात आली. 28 ऑगस्ट 1959 रोजी देशमुख यांनी या संदर्भात ठोस सूचना देण्यास सांगितले. समितीने शिफारस केली की, 28 ऑगस्ट 1959 रोजी देशमुख यांनी नऊ महिन्यांपर्यंत राष्ट्रीय सेवा दिली आणि या दिशानिर्देशांना ठोस सूचना देण्यास सांगितले. समितीने अशी शिफारस केली की उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करणा-या सर्व विद्यार्थ्यांसाठी नऊ महिन्यांच्या कालावधीसाठी राष्ट्रीय सेवा अनिवार्य करण्यात यावी आणि महाविद्यालयात किंवा विद्यापीठात नावनोंदणी करण्याची इच्छा आहे. ही योजना काही सैन्य प्रशिक्षण, सामाजिक सेवा, शारीरिक श्रम आणि सर्वसाधारण शिक्षण यांचा समावेश होता.

5. 1960 मध्ये, भारत सरकारच्या संदर्भात प्रा. के.जी. सईदीनने जगातील अनेक देशांमध्ये अंमलबजावणी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवांचा अभ्यास केला आणि भारत सरकारच्या विकासासाठी काय योजना केली याबद्दलच्या शिफारशींसह सरकारने "युवांसाठी राष्ट्रीय सेवा" या शीर्षकाखाली आपला अहवाल सादर केला. सोशल सर्व्हिस कॅम्प विद्यार्थ्यांना चांगले आंतर-संबंधांसाठी खुले असले पाहिजे.

6. डॉ. डी.एस. कोठारी (1964-66) यांच्या अध्यक्षतेखालील शिक्षण आयोगाने शिफारस केली की विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय कॅडेट्स कॉम्प्लेक्स (एनसीसी) मध्ये सामील होण्यास परवानगी दिली जाऊ शकते जी आधीच स्वैच्छिक पद्धतीने आणि पर्यायी त्याला नॅशनल सर्व्हिस स्कीम (एनएसएस) नावाचे एक नवीन कार्यक्रम स्वरूपात देऊ केले जाऊ शकते.

सप्टेंबर 1969 मध्ये व्हाईस चॅन्सेलर्स कॉन्फ्रसने या शिफारशीचे स्वागत केले आणि सुचविले की कामाचा अनुभव आणि राष्ट्रीय सेवा ही शिक्षणाचा अविभाज्य भाग असावा. मे 1969 मध्ये, शिक्षण मंत्रालयाने आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने आयोजित केलेल्या उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद घेऊन सर्वसमावेशक असे घोषित केले की राष्ट्रीय एकात्मता एक राष्ट्रीय साधन बनू शकते. शहरी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाशी परिचय देण्यासाठी ते वापरले जाऊ

शकते. राष्ट्राच्या प्रगती आणि उन्नतीसाठी विद्यार्थी समुदायाच्या योगदानाचे प्रतीक म्हणून कायमस्वरूपी मूल्याची योजना देखील सुरू केली जाऊ शकते.

नियोजन आयोगाने सेवा योजनेसाठी (एनएसएस) रु 5 कोटी. दिले आणि चौथी पंचवार्षिक योजना निवडण्यात येणा-या संस्था आणि विद्यापीठांमध्ये पायलट प्रकल्प म्हणून एनएसएस प्रोग्रॅम सुरू करणे आवश्यक आहे असे आश्वासन दिले 24 सप्टेंबर 1969 रोजी तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. व्ही.के.आर.व्ही.राव यांनी सर्व राज्यांतील 37 विद्यापीठांमध्ये एनएसएस प्रोग्रामचे शुभारंभ केले आणि त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या सहकार्यासाठी आणि मदतीसाठी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनाही विनंती केली. गांधी शताब्दी वर्षांत हा कार्यक्रम सुरु झाला. कारण गांधीजींनी भारतीय युवावर्गाला भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यास व आपल्या देशाच्या दलित समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी सहभागी होण्यास प्रेरित केले.

कार्यक्रमाचे मुख्य तत्त्व असे आहे की, युवकांनी आणि शिक्षकांनी संयुक्तपणे सामाजिक सेवांमध्ये सहभागी होउन राष्ट्रीय विकासाच्या कार्यात सहभाग घेणे समाज कार्य अनुभव घेउन युवकांनी विद्यापीठ करिअरच्या अखेरीस कोणत्याही संस्थेत स्वयंरोजगार किंवा रोजगाराच्या संधी शोधण्यास स्वत:ला सिध्द करणे युवकांना जीवनाच्या सत्यतेबद्दल जागरूकता, लोकांचे समस्यांचे एक चांगलं ज्ञान आणि कौतुक. अशा प्रकारे, एनएसएस म्हणजे समाजाच्या गरजेशी संबंधित कॅम्पस तयार करण्याचा ठोस प्रयत्न आहे. एनएसएस युनिट्सचे उत्तम काम आणि अनुकरणीय वर्तणुकीचे अनेक उदाहरण आहेत

विद्यापीठ आणि +2 लेव्हलच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सेवा आणि समाजासाठी व्यापक विकासासाठी गावांचा अवलंब, मेडिको-सामाजिक सर्वेक्षणे, वैद्यकीय केंद्रे स्थापन करणे, मोठ्या प्रमाणातील प्रतिरक्षण कार्यक्रम, स्वच्छता मोहिमा, प्रौढ शिक्षण कार्यक्रम समाजातील दुर्बल घटकांसाठी, रक्तदानामुळे, रुग्णालयातील रुग्णांना मदत करणे, आश्रयस्थानातील कैद्यांना मदत करणे आणि शारीरिक विकलांग करणे इ. एनएसएस स्वयंसेवकांनी नैसर्गिक आपत्ती /आपत्कालीन परिस्थितीत जसे चक्रीवादळे, पूर, दुष्काळ, भूकंप, इत्यादींच्या बाबतीत सराईत आरामदायी काम केले. देशभरातील वेळोवेळी एनएसएसच्या विदयार्थ्यांनी सामाजिक दुष्टता निर्मूलन करण्याच्या मोहिमा आयोजित करण्यासाठी तसेच राष्ट्रवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक सामंजस्य आणि वैज्ञानिक आक्रमकांचा विकास यांसारख्या राष्ट्रीय पातळीवरील स्वीकारलेल्या उदिदष्टांच्या लोकप्रियतेचे आयोजन केले आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) मुख्य लक्ष्य :-

I ज्या समुदायात ते कार्य करतात त्यांना समजून घ्या.

ii. त्यांच्या समाजाच्या संबंधात स्वतःला समजून घ्या

iii. समाजाच्या गरजा आणि समस्यांची ओळख करुन देणे आणि त्यांना समस्या सोडवणे

iv. आपापसांत सामाजिक व नागरी जबाबदारीची जाणीव विकसित करणे

v. वैयक्तिक आणि समस्यांच्या समस्यांसाठी व्यवहारिक उपाय शोधण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा वापर करणे

vi. समूह-जिवंत आणि जबाबदा-या सामायिक करणे, आवश्यक असलेली क्षमता विकसित करणे

vii. समाजातील सहभागासाठी कौशल्य प्राप्त करणे

viii नेतृत्व गुण आणि लोकशाही दृष्टिकोन निर्माण करणे

ix. आणीबाणी व नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी क्षमता विकसित करणे

x राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सुसंवाद राखणे

राष्ट्रीय सेवा योजनतील अंतर्भाव :-

आदर्श वाक्य :-

Not me but you हा हेतू लोकशाही पद्धतीचे सार प्रतिबिंबित करतो. एनएसएस स्वयंसेवक युवक मानवी कल्याणासाठी प्रयत्नांची पराकष्टा करतात. समाजाला निस्वार्थी सेवा प्रदान करतात सामाजिक बदलासाठी राष्ट्रीय सेवा योजना सतत प्रयत्न करते.

चिन्ह :-

एनएसएसचे प्रतीक भारताच्या ओरिसातील विश्व प्रसिद्ध कोणार्क सुर्य मंदीर शहराच्या चक्रावर आधारित आहे. चक्र हे निर्मिती, संरक्षण आणि धर्म चक्रांचे वर्णन करते आणि वेळ आणि स्थानावर आयुष्यभर हालचाली चिन्हांकित करते, प्रतीक म्हणजे निरंतरता आणि बदल यांच्या करीताच आहे

बॅज

NSS चिन्ह बॅजवर उमटवलेला आहे. चक्रातील आठ बार दिवसाचे 24 तास दर्शवतात. लाल रंग दर्शवितो की स्वयंसेवक चैतन्यपूर्ण, उत्साहपूर्ण, उत्साही आणि उच्च प्रेरणेने भरलेला तरुण रक्त आहे. निळा रंग एनएसएस मधील, युवकांचा विश्वास सूचित करते,

आर्थिक व्यवस्था:

या योजनेची अंमलबजावणी केंद्रीय आणि राज्य सरकारांनी 7:5 च्या गुणोत्तरांमध्ये नियमित उपक्रम (आरए) आणि विशेष कॅम्पिंग प्रोग्राम (एससीपी) आयोजित करण्यासाठी केले जाते नॅशनल सर्व्हिस स्कीमसारख्या युवा कार्यक्रमास यशस्वी नियोजन आणि अंमलबजावणीसाठी विविध स्तरांवर प्रशासकीय संरचना खालील प्रमाणे असते.

1 राष्ट्रीय पातळी
2. कार्यक्रम सल्लागार
3. प्रोग्राम ॲडव्हाझर सेल
4. एनएसएस प्रादेशिक केंद्र
5. एनएसएस प्रादेशिक केंद्रांची कार्ये

(अ) राज्य सरकार

राज्य एनएसएस सेल यात राज्य संपर्क अधिकारी असतो

1 एनएसएस विद्यापीठ सेल :- प्रत्येक विदयापीठाकडे संलग्न असलेल्या महाविदयालयांतील एनएसएस प्रोग्रामचे पर्यवेक्षण आणि समन्वय राखण्यासाठी एनएसएस सेल असावा.

10000 पेक्षा अधिक एनएसएस स्वयंसेवकांची ताकदवान असलेल्या विदयापीठांमध्ये पूर्ण वेळ कार्यक्रम समन्वयक असणे आवश्यक आहे. 10000 पेक्षा कमी एनएसएस स्वयंसेवकांची कमतरता असलेले विदयांपीठामध्ये अंशकालिक कार्यक्रम समन्वयक असू शकतात. एनएसएस एक शैक्षणिक विस्तार कार्यक्रम असून विद्यापीठ आवश्यक संरचना आणि टेलिफोन, ऑफिस व ऑफिस इक्विपमेंट सारख्या सुविधा आणि सेलची सुधारणा कार्यवाहीसाठी सेक्रेटरीअल सहाय्य पुरवेल. सेल कुलगुरूच्या खाली कार्य करेल, कार्यक्रम समन्वयक, NSS सेलचा प्रमुख हा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल.

2. प्रोग्राम को-ऑर्डिनेटर

एनएसएस संबंधित प्रोग्राम को-ऑर्डिनेटर महत्वाचे कार्य करतो. समर्पित कार्यक्रम समन्वयक योग्य दृष्टीकोनातून एनएसएसच्या कार्यक्रमाची आखणी, अंमलबजावणी आणि मूल्यमापन करू शकतो. कार्यक्रम समन्वयक शासनाच्या सर्व प्रशासकीय व धोरणात्मक निर्देशांचे पालन करेल, राज्य सल्लागार समिती आणि विद्यापीठ सल्लागार समितीचे निर्णय. भारत सरकारच्या दिशानिर्देशांनुसार NSS कार्यक्रम राबवेल.

कार्यक्रम समन्वयक टर्म / कालावधी

एका वर्षाच्या पुढे तीन वर्षांच्या कालावधीसाठी केली जाईल. कायमस्वरुपी कोणताही कार्यक्रम समन्वयक नियुक्त केला जात नाही.

कार्यक्रम समन्वयकांचे कार्य

(अे) महाविद्यालयीन स्तरावर एनएसएस कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी एनएसएस युनिटला मदत आणि मार्गदर्शन करणे.

(बी) एनएसएसच्या युवकांसाठी शिबिरे, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यास मदत करणे.

(सी) देखरेख व मुल्यांकनसाठी एनएसएस युनिटला भेट देणे.

(डी) एनएसएस नियमित उपक्रम आणि विशेष कॅम्पिंग कार्यक्रमांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

(ई) महाविद्यालयांना अनुदान देण्याची वेळोवेळी पुनर्रचना करणे.

एनएसएस युनिट :- एक युनिटची ताकद सामान्यत: 100 एनएसएस मधील स्वयंसेवक असेल. अपवादात्मक परिस्थितीत एनएसएस युनिटची शक्ती 120 स्वयंसेवकांपर्यंत वाढविता येऊ शकते,

किमान एनएसएस युनिट 75 एनएसएस वर्कच्या ताकदीने सुरू करता येते. एनएसएस मधील स्वयंसेवकांची नोंदणीत पहिल्या आणि व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांतून घेतील. ज्या विदयार्थ्यांनी 10+2 स्तरावर एनएसएस स्वयंसेवक म्हणून काम केले आहे त्यांना प्राधान्य दिले पाहिजे.अल्पसंख्यक

समुदायातील विद्यार्थी, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती एनएसएसमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करतात. त्यांना योग्य प्रतिनिधित्त्व दिले पाहिजे. महाविदयालयांमध्ये मुलींना एनएसएसमध्ये सामील होण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. भारतीय विदयांपीठांमध्ये अभ्यास करणा-या परदेशांतील विदयांर्थ्यांना एनएसएसमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. जेणेकरून ते राष्ट्रीय पुनर्रचना आणि समाजाच्या कामाचे अनुभव सांगतील.

कार्यक्रम अधिकारी :- एक कार्यक्रम अधिकारी फक्त एकाच युनिटचा प्रभारी असेल.शिक्षक, प्राध्यापक असणा-यांना केवळ कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी विचारात घेतले जाईल.

कार्यक्रम अधिकारी,उपसंचालक, कर्तव्ये आणि कार्ये :- शिक्षक, समन्वयक, एक पर्यवेक्षक, प्रशासक आणि सार्वजनिक संबंध अधिकारी यांची भूमिका बजावतात त्याचे कार्य खालील प्रमाणे केले जाऊ शकते: -

(ए) एक **आयोजक** म्हणून

(i). विद्यार्थ्यांना आणि महाविद्यालयीन समुदायाच्या इतर सदस्यांना योजनेचा अर्थ सांगावा आणि योजनेबद्दल जागरूकता निर्माण करणे;

(ii). एनएसएसच्या कामासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, भरती करणे आणि निवड करणे;

(iii). समुदाय एजन्सीज, सरकारी विभाग आणि बिगर सरकारी एजन्सीजची सहकार्य आणि समन्वय घेण्यासाठी; आणि

(बी) एक **शिक्षक** म्हणून

(i) राष्ट्रीय सेवायेजनेतील संघाच्या स्वयंसेवकांसाठी कार्यक्रम तयार करण्यासाठी, सामाजिक सेवेची संकल्पना स्पष्ट करणे आणि या योजनेची उदि‌दष्टये प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या पदधती आणि कौशल्ये सांगणे.

(ii) समुदायातील शिक्षण, सभा, बोलणी, बातम्या बुलेटिन इत्यादीव्दारे प्रोत्साहन देण्यासाठी आणि

(क) **समन्वयक** म्हणून

(i) विद्यार्थ्यांची क्षमता आणि समुदाय मागणीनुसार एनएसएस समन्वय साधणे.

(डी) **पर्यवेक्षक** म्हणून

(i) विदयार्थ्यांना त्यांची नोकरी कशी करावी हे शिकण्यासाठी सहाय्य करणे.

(ii) मूल्यमापन आणि पाठपुरावा काम करण्यास मदत करणे.

कार्यक्रम अधिकारी निवड संबंधित विद्यापीठाच्या प्रोग्राम को-ऑर्डिनेटरशी सल्लामसलत करून संस्थेच्या प्राचार्यानी करावी प्रोग्राम ऑफिसर केवळ शैक्षणिक संस्थामधील सदस्यांमधूनच निवडला जाईल. महिला महाविद्यालय / मुलींच्या शाळांमध्ये एक महिला शिक्षक कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्त केला जावा. तथापि, पुरुष सदस्य महिला कार्यक्रम अधिकारी मदत करू शकतात.

एक शिक्षक जो उच्च पातळीवर आहे, कामासाठी योग्यता आणि सर्व विद्यार्थ्यांशी चांगली वागणूक असलेल्यास कार्यक्रम अधिकारी करतात कालावधी पहिल्या टप्प्यात 3 वर्षांचा असेल. तथापि, प्राचार्य आणि कार्यक्रम समन्वयक यांनी आपल्या कामगिरीच्या पुनरावलोकनाच्या आधारावर, हा कालावधी चार वर्षापर्यंत वाढवू शकतात.

दृष्टीकोन:-

एनएसएस कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट हे लोकशाही, आत्मविश्वास आणि आत्मनिर्भर जीवनशैलीसाठी एनएसएस स्वयंसेवक तयार करणे हे आहे. म्हणूनच एनएसएस युनिट्स संघटित आणि लोकशाही मार्गांवर जाण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. विद्यार्थी नेते, एनएसएस नेते, एनएसएस स्वयंसेवक आणि कर्मचारी इतर सदस्य, आणि समाजातील नामवंत व्यक्ती देखील त्याच्याबरोबर संबधीत आहेत. एनएसएस प्रोग्रामचे नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यमापन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

ऑगस्ट 1984 मध्ये भारत सरकारव्दारे आढावा समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या एक महत्त्वाच्या शिफारसींपैकी एक म्हणजे एनएसएसच्या कार्यक्रमात मोठी संघटन क्षमता होती. आणि म्हणूनच त्याला पुढे चालू ठेवावे आणि विस्तार करावा. समितीने प्रत्येक वर्षी एनएसएस अंतर्गत विद्यार्थ्यांच्या संख्येत 10 टक्के वाढ करण्याची शिफारस केली होती. या समितीची ही शिफारस सरकारने स्वीकारली आहे. अलीकडे, ही योजना ओपन युनिट बनविण्यात आली आहे, ज्यामध्ये माजी एनएसएस (NSS) स्वयंसेवकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

D) नांदेड जिल्हा महिती :-

नांदेड या नावाचा उगम नंदी-तट या शब्दामधून झाला आहे. नांदेड हे सन 1725 मध्ये हैदराबाद संस्थानाचा हिस्सा झाले शालिवाहन काळात नांदेड ही भारतातील मोठी बाजारपेठ होती कल्याणीचे चालुक्य, देवगिरीचे यादव यांच्या संपन्नतेचा लाभ नांदेडला झाला प्राचीन काळापासून हे संस्कृत विदयेचे पीठ आहे साहित्य, कला, सौदर्य, निसर्ग आणि सर्वगुणसंपन्नतेचा वारसा नांदेडला लाभला आहे.

१९२० साली अखिल भारतीय कॅाग्रेसने घटनेच्या पहिल्या मसुद्यातच भाषावार प्रांत रचनेचा विचार समाविष्ट केला होता. भारत सरकारच्या पोलीस कारवाईनंतर 17 सप्टेंबर 1948 रोजी स्वतंत्र भारत देशात समाविष्ट झाला १९५५ साली फाजल अली अहवाल सादर झाला. व्दैभाषीक मुंबई राज्य अस्तित्वात आले. हैद्राबाद राज्याचे विभाजन झाले. मराठवाडा मुंबई राज्यात समाविष्ट झाला. नांदेड जिल्हा आता हैद्राबाद राज्यातून मुंबई राज्यात समाविष्ट झाला. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. मुंबई प्रांताचे विभाजन होऊन गुजरात आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये निर्मीली गेली. भारत सरकारच्या पोलीस कारवाईनंतर 17 सप्टेंबर 1948 रोजी स्वतंत्र भारत देशात समाविष्ट झाला

१९५५ साली फाजल अली अहवाल सादर झाला. व्दैभाषीक मुंबई राज्य अस्तित्वात आले. हैद्राबाद राज्याचे विभाजन झाले. मराठवाडा मुंबई राज्यात समाविष्ट झाला. नांदेड जिल्हा आता हैद्राबाद राज्यातून मुंबई राज्यात समाविष्ट झाला. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. मुंबई प्रांताचे विभाजन होऊन गुजरात आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये निर्मीली गेली.

महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सीमेलगत नांदेड जिल्हा आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत नांदेड लोकसंख्या प्रमाण 2.99% एवढे आहे. नांदेड जिल्हयांची लोकसंख्या 3,361,292 एवढी आहे त्यात स्त्रिया 1631217 (48.53%) आणि पुरुष 1730075 (51.47%) असे प्रमाण आहे .जिल्हयाचे क्षेत्रफळ 10422 चौरस कि.मी., आणि सरासरी साक्षरता 75.45 एवढे आहे.

नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्यातील मराठवाडयाचा भाग बनला आहे. अत्यंत संथ गतीने वाटचाल करणारे मध्ययुगीन सलतनतीतले नांदेड आता झपाट्याने बदलु लागले. नंदीतटांचे नांदेड आता लहान गावठाण राहीले नाही, शहर बनले, पाहता पाहता शहराचा विस्तार घडत गेला आणि नांदेड-वाघाळा महानगरपालीका अस्तित्वात आली. संपुर्ण जिल्ह्यात मिळुन एक हायस्कुल असलेल्या नांदेडात स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ स्थापन झाले. अनेक महाविद्यालये निघाली. मेडीकल, इंजिनिअरीग,लॉं,फार्मसी अशा विविध विद्याशाखांचे शिक्षण देणारी महाविद्यालये अस्तित्वात आली. नांदेड जिल्ह्याने मध्ययुगीन मागसलेपणाची कात टाकुन २१ व्या शतकाकडे वाटचाल सुरु केली आहे.

शैक्षणीक संस्था यात नांदेड शहरात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ कार्यरत आहे या विद्यापीठा अंतर्गत नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली या 04 जिल्यातील संलग्न महाविद्यालये कला वाणिज्य विज्ञान विधी महाविद्यालये याचा समावेश होतो. तसेच वैद्यकीय महाविद्यालय, आयुर्वेदिक महाविदयालय तसेच अभियांत्रिकी महाविद्यालय, अध्यापक महाविदयालय सुध्दा आहेत

नांदेड जिल्हयात नांदेड, भोकर, हदगांव, बिलोली, किनवट, मुदखेड, धर्माबाद, हिमायतनगर, माहूर, मुक्रमाबाद, अर्जापूर, लोहा, कंधार, मुखेड, उमरी, देगलूर हे 16 तालुके आहेत 01 नांदेड वाघाळा महानगरपालीका आहे तसेच 12 नगरपरिषद आहेत तर 04 नगरपंचायत आहेत या माहूर, अर्धापुर , हिमायतनगर, नायगांव याचा समावेश आहे नांदेड जिल्हयात गोदावरी मांजरा मन्याड, सरस्वती, पैनगंगा आसना, सीता, व लेंडी या नदया आहेत यात नांदेड तालुका हा बहुसंख्येने शहरी भाग आहे तर बाकी ग्रामीण तालुके आहेत यात किनवट माहूर हे आदिवासी तालुके आहेत.

साहित्य परिक्षण :- प्रस्तुत संशोधन विषयाशी निगडीत असणा-या अनेक विचारवंत अभ्यासक व संशोधकांच्या नित्कर्षाचे साहित्य परिक्षण पुढीलप्रमाणे

1 भविष्यात युवकांना ग्रामीण व शहरी स्तरावरील येणा-या अडचणी सोडवण्यासाठी तयार करणे देशातील मोठी स्वयंसेवी चळवळ यात युवकांना त्यांची ऊर्जा, आवड नैसर्गिक सामर्थ्याचा वापर

करण्यासाठी संधी आहे. त्यातून वेगवेगळे आवडीचे विशेष कार्यक्रम, सहभागातून प्रात्यक्षिक वाढवून व्यक्तिमत्व विकासास संधी आहे. मागास, संधी पासून वंचित राहीलेल्या लोकांच्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांच्या माध्यमातून सहभाग वाढवून विकास झालेल्या लोकांसारखे तयार करणे. क्रियाशील आणि उपभोग्य सेवा समाजासाठी तयार करणे. सुसंस्कृत मर्यादा स्पष्ट करणारा कौशल्य विकसित करणारा युवक तयार करून त्यातून नेतृत्वाची भूमिका करण्यास भाग पाडणे सत्ता आणि क्षमता यांचा वापर करणे चांगले काम पुढील पिढीसाठी संस्कृतीमध्ये रूजविण्याचे माध्यम राष्ट्रीय सेवा योजनेतील युवक हे आहेत असू नमूद दि 12/02/2018 रोजीच्या मेघालय टाईम्सच्या कौशल्य विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना लेखामध्ये नमूद करण्यात आले आहे.

2 "Personality Development of students through service learing a study on national service scheme" या "Dr suresh Lal" यांचे लेखात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना या सामाजिक समस्या जागरूकता वाढवतात, तळागाळातील समुदाय आणि अल्पसंख्याक समाजासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग वाढविणे, युवकामधील आत्मविश्वास आणि बहूमान वाढविणे मागच्या अनुभवावरून चालू परिस्थितीत यशस्वी भविष्यासाठी पुढे कुच करणे

3 "The NSS Development of the personality of students through community service" या "ओ समावोजाब देवी आणि डॉ अे सुरूअेसिट सिंग" यांच्या लेखात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक आणि नैतिक मुल्ये पुरविते विदयार्थ्याना नुसते पुस्तकी शिक्षण वर्ग खोलीत देवून विकास होणार नाही तर त्यांना सामाजिक परिस्थितीचे समाजाविषयीचे ज्ञान देणे आवश्यक आहे म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक योजना 1986 आणि त्यातील सुधारणा 1992 नुसार शैक्षणिक संस्था आणि विदयार्थ्याना सहभागासाठी एनएनएस किंवा एनसीसी यापैकी एक सहभागाची योजना राबबाबी असे ठरविण्यात आले आहे.

राष्ट्रीय सेवा योजना समाजाच्या गरजा आणि महत्वाकांक्षा लक्षात घेवुन त्या मिळविण्यासाठी प्रयत्न करते. ज्ञान आणि कौशल्य यांचा वापर करून लोकांभिमुख कामे करते.

4 A Study of the impact of national service scheme nss on college students and community Research Lokhande Dhanjay Baburao यांच्या प्रंबधात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही प्रात्यक्षिक कार्य असून ती चांगले परिणाम देणारी योजना आहे. राष्ट्रीय सेवा योजना ही प्रभावशाली बदलांचे साधन आहे. जबाबदार नागरीकांचे शिक्षण देणारी योजना आहे राष्ट्रीय सेवा योजना ही फक्त कृती नसून ती एक सामाजिक चळवळ आहे. त्यात क्रियाशील सहभागी सदस्य हे महत्वाचे असतात

5 राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविदयालयीन विदयार्थ्यात झालेल्या नेतृत्व गुणांच्या विकासांचे चिकित्सक अध्ययन विशेष संदर्भ अमरावती जिल्हा कालखंड 1983-2000 या दिलीप हरिभाउ कांबळे यांचे प्रबंधात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही मनुष्यबळ विकासाची एक कृतीशाळा असल्यांने प्रवेशित युवकांच्या सहभागावर यशापयश अवलंबुन असते.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर महत्वपूर्ण उपक्रम असून युवकांना ग्रामीण समस्याची जाणीव व्हावी. स्वयंसेवक व समाज जनता यांचा जवळचा संबध येवून रचनात्मक प्रकल्प उभारला जावा श्रम जाचक न वाटता प्रेरक वाटावे सुशिक्षीत आशिक्षीत हा समाजविघातक भेद कमी व्हावा विदयार्थ्याना वेगवेगळया अनुभवातून त्यांच्यात नेतृत्वाचे गुंण विकसित व्हावे त्यांच बरोबर देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेला बळ यावे. राष्ट्रीय सेवा योजना मध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करून तिचा विकास करणे

6 राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विदयार्थ्याचा विकास होय राष्ट्रांच्या जडणघडणांमध्ये युवकांचे योगदान अत्यंत महत्वाचे असल्यांने युवकांमध्ये नेतृत्व गुण, कौशल्य, मुल्यशिक्षण, श्रमांचे संस्कार होणे अगत्यांचे आहे राष्ट्रीय सेवा योजना विविध उपक्रमाच्या माध्यमातुन व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्नशील आहे निवासी विशेष शिबीराव्दारे विदयार्थ्यानां सहजीवन, सहभोजन, सामूहिक जबाबदारी, सामाजिक प्रश्नांची जाणीव, मुल्यंसंस्कार, इत्यांदीचे शिक्षण मिळत असते. राष्ट्रीय एकात्मता शिबिर/ साहसी शिबिराव्दारे विदयार्थ्याना मानवनिर्मित व नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला कसा करावा. आपत्ती निर्माण झाल्यास त्यांचे निवारण कसे करावे. यांचे प्रशिक्षण दिले जाते असे मत डॉ अतुल ह साळुंके राज्य

संपर्क अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी मुंबई यांनी प्रथम आवृत्ती नोव्हेबर 2014 च्या पुस्तिकेत नमूद केले आहे.

7 शिक्षणांला जर समाजपयोगी बनविले गेले तर नक्कीच शिक्षणाचे महत्व वाढते. सिंहाचा नाही तर खारीचा वाटा म्हणून सामाजिक बांधिलकी जोपासत समाजऋण पूर्ण करणे गरजेचे आहे. प्रगतीच्या वाटेत दशा, दिशा, गती, परिणाम यांचा ही विचार तितकाच महत्वाचा आहे. समाजऋण पूर्तीची वाटचाल कुटूंबापासून ते शालेय जीवन, महाविदयालयीन जीवनापर्यंत येऊन पोहोचली, विषय शिकवतांना सारस्वतांचे समुपदेशनाच्या माध्यमातून हा वारसा पुढे रेटता आला. क्षेत्रीय भेटी, शैक्षणिक भेटी, मुलाखत यातून वंचित घटकांच्या समस्या जवळून निरीक्षण करायला मिळाल्या, दिव्यांग अनाथ, पिडीत,अंध, वृध्द दुर्धर आजारांच्या विदयार्थ्यांशी संवाद करण्यांची संधी प्राप्त झाली आणि सलग पंधरा वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य करतांना वेगवेगळया व्यक्तिमत्वाची ओळख त्यातून समन्वय करण्याचे कौशल्य हस्तगत झाले असे मत प्रा. डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे यांनी समाजसेवेची कृतीशील प्रयोगशाळा राष्ट्रीय सेवा योजना या पुस्तकांत नमूद केले आहे.

वरील नित्कर्ष हे विविध अभ्यासक संशोधकांनी भिन्न भिन्न परिस्थितीत काढले आहेत. प्रस्तुत संशोधनात युवकांच्या व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका याबाबत नांदेड जिल्हयातील महाविदयालयाचा अभ्यास केला जाणार आहे.

1 संशोधनाची आवश्यकता/ विषय निवडण्याचे कारण (Need of Research) :

मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे मन की बात चे लिखाण वाचण्यात आले त्यातील मोदीनी उल्लेखीत श्रीनगरचा 18 वर्षाचा नवयुवक बिलाल डार याच्याविषयी माहिती देण्यात आलेली होती त्यात श्रीनगरच्या नगरपालिकेने बिलाल डार या तरूणाला स्वच्छतेसाठी आपला ‘सदिच्छा दूत’ म्हणून बनवले आहे.कारण बिलाल डार आपल्या वयाच्या 12-13 व्या वर्षापासून गेली पाच-सहा वर्षे स्वच्छतेचे काम करतोय. आशियातला सर्वात मोठा तलाव श्रीनगरजवळ आहे, या तलावामध्ये प्लॅस्टिक असेल, पॉलिथीन असेल, वापरलेल्या बाटल्या असतील, कचरा, घाण असेल तो सगळे काही काढून तलाव स्वच्छ करतोय. त्यातून थोडीफार कमाईही करतो. कारण त्याच्या वडिलांचा फारच लवकर कर्करोगाने मृत्यू झाला आहे. परंतु बिलालने जगण्यासाठी लागणारे उत्पन्नाचे साधन शोधतानाच त्याची सांगड स्वच्छतेशी घातली आहे. बिलाल दरवर्षी 12 हजार किलोपेक्षा जास्त कचरा साफ करतो, असा अंदाज वर्तवला जात आहे. स्वच्छतेविषयी बिलालसारख्या श्रमजीवी युवकाला सदिच्छा दूत बनवण्याची कल्पना येउु शकते तर असा विचार युवकांच्या मनात का येउु नये?

महाराष्ट्राचे एक सेवानिवृत्त शिक्षक श्रीमान चंद्रकांत कुलकर्णी यांच्याविषयी मा. मोदीजीनी उल्लेख केला त्यांनी त्यांना सोळा हजार रूपये निवृत्ती वेतन मिळते. आपल्या या निवृत्ती वेतनामधून, त्यांनी पाच हजार रुपयांचे 51 पोस्ट डेटेड चेक स्वच्छता कार्यासाठी दान म्हणून दिले होते. एक सेवा निवृत्त शिक्षक राष्ट्र विकासासाठी ऐवढे मोठे काम करू शकतो तर देशाचा कणा असलेल्या युवकामार्फत आपण मोठे समाजविधायक काम करून समाजातील लोकसहभाग वाढवून सामाजिक समस्या कमी करू शकतो

श्रम करा, काम करा, आणि गरजवंताना सहाय्य करा असे गुरु नानक देवजींनी सार्थक जीवनाचे तीन संदेश दिले. आपली तत्वं सांगण्यासाठी गुरु नानक देवजींनी ‘गुरबाणी’ ची रचना केली. चला तर मग, आपण त्यांच्या संदेश आणि शिकवणीच्या मार्गावर वाटचालीचा प्रयत्न कसा करता येईल?

वरील तिनही घटना वरून माझ्या मनात असे विचार आले की आपण मोठया प्रमाणात जागृत अशा महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील सहभागी युवकातुन आपण हे काम करू शकू त्यावरून मी “युवकांच्या व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका ” असा विषय संशोधनासाठी निवडावा असे ठरविले.

2. संशोधन विषयाचे महत्व (Importance Of Subject) :

विविधता ही भारतीय समाजाची वस्तुस्थिती आहे. ही विविधता आपणांस भौगोलीक, प्रादेशीक धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आढळते. या विविधतने भारतीय संस्कृतीची समृध्दी जाणवते. जी राष्ट्रीय एकात्मतेसाठी पोषक असते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एकात्मतेची ही भावना हळूहळू ओसरत चालली आहे राष्ट्रीय एकात्मतेत अनेक अडथडे आहेत त्यात साप्रंदायिकता, जातीयता, भाषावाद, दहशतवाद, विषमता, भष्ट्राचार इत्यादीचा समावेश करता येईल तसेच विविधता असलेल्या देशात आदिवासी,ग्रामीण,नागरी समूदाय आहेत. तसेच बालक, युवक, वृदध, महिला अपंग इ. वयोगट आहेत तसेच मागास प्रवर्गात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती आणि इतर मागासवर्गीय आहेत तसेच अल्पसंख्याक समाज आहे. प्रत्येकांच्या समस्या वेगवेगळया आहेत. या सर्व समस्यांना शिक्षीत युवकांच्या माध्यमातुन राष्ट्रीय सेवा योजनेतून नैतिक गुण, आदर्श चरित्र, सामाजिक ऐक्य, सामाजिक आणि आर्थिक समानता, सहकार्य आणि सहिष्णुता इ गुंणांचा विकास करता येईल. राष्ट्रबांधणी आणि राष्ट्रीय एकात्मतेस चालना देता येईल सामाजिक समस्या कमी करण्यासाठी लोककल्याणाच्या योजनेत युवकांचा सहभाग वाढविणेकामी प्रयत्न करता येतील राष्ट्रीय एकात्मते समोरील अडथळे दूर करणेसाठी युवकांच्या माध्यमातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. केवळ शासनावर विसबुंन चालणार नाही तर युवकांच्या माध्यमातून तसेच सर्वानीच यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी आपणांस अविरत प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी धर्मनिरपेक्षता प्रभावी झाली पाहीजे युवकांना समान व्यासपीठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचा अर्थ युवकांना समजला तर ख-या अर्थाने युवक सामाजिक चळवळीतून एकत्रीत पणे येउन विचार मंथन करून समस्येचा अभ्यास करू शकतात. त्यावर पर्याप्त नैसगिक साधने कोणती त्यांचा वापर करून आपण लोकांना/समाजासाठी/गांवासाठी काय सुविधा देउ शकतो जिल्हयातील समस्या कशा कमी करू शकतो त्यातून खरा समाज विकास आणि पर्यायाने स्व: विकास कसा साधला जातो भावनाशील सुजाण देशप्रमी युवक कसा घडतो सामाजिक उदात्त ध्येय कशी गाठू शकतो यातून आपण हे साध्य करू शकतो.

3 संशोधनाची उददीष्टे :-

1 राष्ट्रीय सेवा योजने मध्ये सहभागी झालेल्या विदयार्थ्याच्या वैयक्तिक कौटूंबिक आर्थिक शैक्षणिक सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

2 राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झालेल्या युवकांच्या व्यक्तिमत्वात झालेल्या विकासांचा बदल अभ्यासणे.

3 राष्ट्रीय सेवा योजनेतून युवकांमध्ये होणारा सामाजिक बदल अभ्यासणे.

4 राष्ट्रीय सेवा योजनेत विधायक कामे, जनसहभाग सहभागी गावांचा झालेल्या विकासाचा अभ्यास करणे.

5 राष्ट्रीय सेवा योजनाचे उपक्रम राबवित असतांना आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

6 राष्ट्रीय सेवा योजना अंमलबजावणीमध्ये शासनाच्या भूमिकेची तपासणी करणे

4 गृहीतकृत्ये :-

1. युवकांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची मोलाची भूमीका बजावत आहे.
2. राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना विकासाभिमुख बनविते.
3. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे समाजात एकात्मता निर्माण होत आहे..
4. युवाशक्तीचा उपयोग राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विकास कामांसाठी होत आहे.
5. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संघटीत कार्यातून संघटन आणि नेतृत्व, गुणांचा विकास होत आहे.
6. ग्रामीण,शहरी भागातील विकासकामे व युवकांचा राष्ट्रीय सेवा योजनेत सहसंबध आहे.

5 अध्ययनाच्या मर्यादा (Limitation Of Study) :

प्रस्तुत संशोधानात राष्ट्रीय सेवा योजनेत नांदेड जिल्हयातील आदिवासीतालुके ग्रामीण/तालुके शहरी महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजना राबविण-या महाविदयायलयातील सहभागी विदयार्थी तसेच माजी विदयार्थी, कार्यक्रम अधिकारी तसेच श्रमसंस्कार शिबीरे आयोजीत करण्यात आलेली गावतील पंचमंडळी,

युवा मंडळ सामाजिक राजकीय पदाधिकारी यांना सहभागी करून घेवून सामाजिक शिबीरे कशी राबवावी कुठल्या बाबीवर भर दयावा. याबाबतची मते आजमावता येतील. त्यातून युवक सामाजिक समस्या कशा कमी करू शकतील गाव विकासातून स्व:विकास/ व्यक्तिमत्व विकास कसा साधता येईल हे नांदेड जिल्हयापुरते संशोधन कार्य करण्यात येईल.

6.संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र (Geographical Area Of Study) :

संशोधनाचे भौगोलीक क्षेत्र म्हणून मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे. नांदेड जिल्ह्याचे एकुण भौगोलीक क्षेत्र 10528 चौ.कि.मी. इतके आहे. नांदेड जिल्ह्यात 16 तालुके आहेत 33 अनुदानित महाविदयालये आहेत आणि 98 कायम विना अनुदानित महाविदयालये आहेत त्यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून झालेली कामे नांदेड जिल्हयातून तपासता येतील.

7. नमुना निवड पध्दती (Sampling) :

प्रस्तुत संशोधन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विदयापीठ नांदेड अंतर्गत परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर हे 04 जिल्हे येतात त्यात नांदेड जिल्हयाची निवड करण्यात घेऊन नांदेड जिल्हयात 16 तालुके आहेत नांदेड जिल्ह्यातील तालुके- अर्धापूर, भोकर, बिलोली, देगलूर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर, कंधार, किनवट, लोहा, माहूर, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगाव, उमरी हे आहेत त्यात नांदेड जिल्हयात अनुदानित 33 महाविदयालये 98 कायम विनाअनुदानित महाविद्यालये आहेत. एकुण 131 महाविद्यालय आहेत.

आजमितीस नांदेड जिल्हयाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी महाविदयालये 46 आहेत त्यात सहभागी युवक विदयाथी एकूण संख्या 5600 इतकी आहे आणि यात महिला पुरूष कार्यक्रम अधिकारी 76 आहेत

संभाव्यता नमूना निवड पध्दतीतील स्तरीय नमुना निवडीव्दारे नांदेड जिल्यातील ग्रामीण/तालुके 13 मधून प्रत्येकी एक याप्रमाणे 13 महाविदयालय, महानगरपालीका /शहरी भागातील नांदेड तालुक्यातून 10 महाविदयालये यात पारंपारीक आणि व्यावसायीक महाविदयालये आणि आदिवासी 02 तालुक्यातील 03 महाविदयालयांची निवड करण्यात येईल राष्ट्रीय सेवा योजंनेतुन झालेली कामे, करावयाची कामे यांचे नियोजन संशोधन कालावधीत केले जाईल.

8. तथ्य संकलन पध्दती (Data Collection Method) :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीचा अवलंब केला जाईल.

अ. प्राथमिक तथ्य (Primary Data) :-

प्राथमिक तथ्य संकलनासाठी निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली, मुलाखत अनुसुची तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनाचे उद्देश व गृहीतके समोर ठेवून प्रश्नावली, मुलाखत अनुसूची बनविली जाईल. तसेच या संशोधनासाठी प्राथमिक तथ्यांव्दारे वस्तुनिष्ठ माहिती मिळवली जाईल.

ब) व्दितीयक तथ्य (Secondary Data) :- शासकीय प्रकाशने, खाजगी प्रकाशने,वर्तमानपत्रे आणि नियतकालीके निगडीत संशोधनपर लेख, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहीक, स्थानिक विशेषांक, शासन अहवाल, शोधपत्रीका, वृत्तपत्र लेख इंटरनेट,□प्स इत्यादींचा संशोधनासाठी आधार घेतला जाईल.

9. तथ्य क्रिया :- (Data Processing) / संकलीत तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्राथमिक तथ्य संकलनाव्दारे मिळालेला माहितीचे तथ्यविश्लेषन व निर्वचन खालील पायऱ्यांच्या माध्यमातून केले जाईल.

अ) संस्करण/ संपादन :-

मुलाखत अनुसुची व प्रश्नावली निरीक्षणातून मिळवलेल्या तथ्यांचे निरीक्षण करुन सर्व नोंदीची तपासणी केली जाईल. संशोधनाच्या उद्देशाला अनुसरुन उपयुक्त माहिती गोळा केली जाईल. संशोधनाच्या दृष्टीने निरुपयोगी माहिती वगळली जाईल.

ब)वर्गीकरण (Classification Of Data):

विषयाला धरुन मिळवलेली माहिती ही अस्ताव्यस्त व विखुरलेली असेल तर तिला संघटीत रुप देण्यासाठी तथ्यांना समानता व विषमता या आधारावर विभाजीत केले जाईल.

क) संकेतीकरण (Coding):-

मिळविलेल्या तथ्यांचे वर्गीकरण केल्यानंतर प्राप्त उत्तरांना संकेत दिले जातील.

ड) मास्टर चार्ट (Master Chart) :-

अनुसुचीत निर्माण केलेले संकेतांचे स्थानांकरण झाल्यानंतर मास्टर चार्ट तयार करण्यात येईल. या मास्टर चार्टच्या आधारे सारणीकरण करता यईल त्या आधारे तथ्यविश्लेषण करण्यात येईल.

इ) सारणीकरण (Tabulation):

विषयाला अनुसरुन संकलीत तथ्यांचे एकचल व चल सारणीकरणाव्दारे विश्लेषण केले जाईल यासाठी साध्या सारण्याचा उपयोग केला जाईल.

10.निष्कर्ष (Conclusion) :-

तथ्यविश्लेषणाच्या आधारे संशोधनाचा उद्देश व गृहीतकाला धरुन निष्कर्ष मांडले जातील संशोधनाच्या गृहीतकृत्याचे निरिक्षण केले जाईल कोणती गृहीतकृत्ये बरोबर ठरली व कोणती सिध्द झाली नाहीत त्या मागची कारणे शोधून काढली जातील संशोधन समस्ये संबंधी योग्य उपाय सुचविले जातील.

11.संशोधन प्रकरण योजना :-

संपूर्ण संशोधन प्रकल्पाची मांडणी पुढील प्रमाणे मांडण्यात येइल

1 प्रस्तावना :- (Introduction)

2 युवक आणि व्यक्तिमत्व विकास संकल्पना :-

3 राष्ट्रीय सेवा योजना अर्थ स्वरूप उदिष्टे :- (Research Methodlogy)

4 राष्ट्रीय सेवा योजनेतील विविध घटक आणि उपक्रम :-

5 माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :- (Data collection & Analysis)

6 नित्कर्ष व शिफारशी :- (Conclusions and Suggestions)

संदर्भ ग्रंथसूची :- (Bibliography)

संशोधक	मार्गदर्शक
गणेश वामन पाटील	डॉ. शेख आसिफोददीन ऐनोदिन
कनिष्ठ प्रशासन अधिकारी	सहाय्यक प्राध्यापक
उच्च शिक्षण,विभागीय कार्यालय	जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविदयालय
नांदेड	सिडको नांदेड